श्रीराम भुमी ४

# देगांव येथील रणरागिणींचा दारुबंदीसाठी एल्गार

## गावातील दारु विक्रेत्यांच्या घरांची झाडाझडती

पिंपळनेर (प्रतिनिधी) : साक्री तालुक्यातील देगांव येथे महिलांनी गावात एकमताने दारुबंदीचा ठराव पारित करुन ही गावात सर्रासरपणे दारु विक्री होत असल्यामुळे रणरागिणी संतप्त झाल्या व त्यांनी पिंपळनेर पोलीसांच्या मदतीने गावातील दारु विक्रेत्यांच्या घराची झडती घेवून त्यांना पोलीसांच्या हवाली केले.





देगांव येथील महिला पुरुषांच्या दारुच्या व्यसनामुळे त्रस्त झाल्या होत्या. त्यामुळे त्यांनी नुकतीच पिंपळनेर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पंजाबराव राठोड यांची पोलीस ठाण्यात भेट घेवून गावात दारुबंदी करण्याबाबत निवेदन देवून चर्चा केली होती. त्याचप्रमाणे गीतांजली कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत महिलांनी गावात बैठक घेवून एकमताने दारुबंदीचा ठराव पारीत केला होता. तरी सुध्दा देगांव-गव्हाणपाडा येथे सर्रासपणे दारुविक्री सुरु असल्यामुळे महिलांनी पिंपहनेर पोलीस ठाण्यात फोन करुन पोलीसांची कुमक मागविली. पोलीस उपनिरीक्षक लोकेश कुमार, हवालदार पावरा सोनवणे हे पथकासह देगांव येथे हजर झाले. महिलांनी त्यांना सोबत घेवून दारु विक्री होत असलेल्या घरात घुसून झाडाझडती घेतली व दारु विक्रेत्यांवर कारवाई करुन त्यांना पोलीसांच्या ताब्यात दिले. रणरागिणींच्या या धाडसाचे कौतुक करण्यात येत आहे.

# अतिवृष्टीमुळे संसार उध्वस्त झालेल्यांना मदत

विसरवाडी (प्रतिनिधी) : दिनांक १७ ऑगस्ट २०१८ रोजी नवापूर तालुक्यात अतिवृष्टीमुळे आलेल्या पुरात बोकाळझर, बोरझर, भामारमाळ चौकी, वाघळापाडा, उची-शेवडी, बर्डीपाडा व जामनपाडा येथील जवळपास ५० कुटूंबांचे संसार उध्वस्त झाले असून सेवाभावी संस्थेकडून वेगवेगळ्या प्रकारची मदत केली जात आहे. मुंबई येथे वास्तव्यास असलेले नवापूर तालुक्यातील झामणझरचे डॉ. उल्हास वसावे यांच्या माध्यमातून जे.व्ही. गोकल चॅरिटी ट्रस्ट व श्री क्रिष्णा फाऊंडेशन यांच्या मदतीने ५० कुटुंबाना सोलापुरी चादर, बेडशीट्स, टॉवेल व ब्लँकेटचे वाटप घरोघरी जाऊन करण्यात आले.



पूरग्रस्त कुटुंबाना साहित्य वाटप करताना आश्रय-दूर्ग संस्थेचे अध्यक्ष जयंत वासावे, नवापूर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी दिलीप कुवर, सरपंच परिषदेचे जिल्हा अध्यक्ष व बोकाळझरचे सरपंच राहुल गावित, दिलीप गावित (सरपंच - करेघाट), विजू कोकणी (सरपंच - बारी भवरे), किरण गावित (सरपंच - बोरझर), विकास गावित (वाघालपाडा), जयंत गावित (जामनपाडा), कोरो संस्थेचे विपुल गावित. जे व्ही गोकल चॅरिटी ट्रस्टचे राजेश वानखडे, शमुवेल गावित, रूपेश जाधव, नितीन गवळी आदी उपस्थित होते.

समाजासाठी काहीतरी करण्याची मनोभावना असलेले डॉ. उल्हास वसावे यांनी जे.व्ही.गोकल चॅरिटी ट्रस्ट व श्री क्रिष्णा फाऊंडेशन यांच्या सहकार्याने मागील चार वर्षापासून नवापूर तालुक्यात फिरता दवाखाना सुरु केला असून पूरग्रस्त गावांना तात्काळ वैद्यकीय सेवा पुरविण्यात आली. शासन व प्रशासन यांच्यावर जास्त अवलंबून न राहता समाजातील सर्व व्यक्तींनी आप-आपल्या परीने आपत्तीग्रस्त कुटुंबाना मदत करण्याचे आव्हान डॉ. उल्हास वसावे यांनी केले.

आपत्तीग्रस्त कुटुंबाच्या व समाजाच्या वतीने बोकाळझरचे सरपंच राहुल गावित यांनी जे.व्ही. गोकल चॅरिटी ट्रस्ट व श्री कृष्णा फाऊंडेशनचे आभार व्यक्त केले.

चार मराठा आंदोलकांच्या